दै. देशोन्नती दि. ०८/१२/२५



# तूरीच्या पिकात गांज्याची लागवड

## ▪ झळकवाडी शिवारातील प्रकार
## ▪ इस्लापूर पोलिसांची कारवाई

देशोन्नती वृत्तसंकलन

**इस्लापूर** : परिसरातील शिवणी ते झळकवाडी शिवारात जंगलाच्या पायथ्याशी असलेल्या शेतात एका शेतकऱ्याने केलेली गांज्याची लागवड आता उघड झाली असून इस्लापूर पोलिसांनी जंगलात शिरून ही कारवाई ७ डिसेंबर रोजी दुपारी केली.

शिवणी ते झळकवाडी दरम्यान जंगलाच्या पायथ्याशी असलेल्या शेतात एका शेतकऱ्याने तुरीच्या पिकांबरोबर गांज्याची लागवड केली होती. दरम्यान इस्लापूर पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक उमेश भोसले यांना याबाबत गुप्त माहिती मिळाली, त्यांनी हिमायतनगर पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक अमोल भगत यांच्यासह आपला फौजफाटा घेवून जायमोक्यावर जावून ही कारवाई केली आहे. या पथकामध्ये पोलिस, महसूलचे कर्मचारी व तसेच फॉरेसिंक पथकाचे कर्मचारी आदींचा समावेश होता. पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांच्या मार्गदर्शनाखाली सदरची कार्यवाही करण्यात आली असल्याची माहिती सहाय्यक पोलिस निरीक्षक उमेश भोसले यांनी दैनिक देशोन्नतीला बोलतांना सांगितली. (वार्ताहर)

## पोलिसांनी गांजा जप्त करुन एकास केली अटक

तुरीच्या पिकांतील गांजाची मोठ्या प्रमाणात असलेली झाडे जप्त केली. सदर गांजा चे जवळपास ५० कि.ग्रॅम वजन होणार असून एकास पोलीसांनी ताब्यात घेतले आहे. पोलीसांच्या या कारवाईमुळे शिवणी परिसरात एकच खळबळ उडाली आहे.